न्यायालयीन अपील दाखल झालेल्या नगरपरिषदा व नगरपंचायतींमधील सार्वत्रिक निवडणुकांसाठी सुधारित निवडणूक कार्यक्रम-२०२५.

सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**निवडणूक प्राथम्य**

ई-मेलद्वारे

**क्र.रानिआ-२०२५/सुनिका/नप/प्र.क्र.१४/का-६**
**नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक :- २९/११/२०२५**

**प्रति,**

**जिल्हाधिकारी,सर्व**

**विषय :- न्यायालयीन अपील दाखल झालेल्या नगरपरिषदा व नगरपंचायतींमधील सार्वत्रिक निवडणुकांसाठी सुधारित निवडणूक कार्यक्रम-२०२५.**

**संदर्भ :-** १) नगरविकास विभागाचे एमसीओ-२०२५/प्र.क्र.२४२/नवि-१४, दि.१०/०६/२०२५, दि.१२/०६/२०२५ व दि.१४/०८/२०२५ अन्वये प्रभाग रचना कार्यक्रम

२) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०२५/प्र.क्र.११/का-६, दि.०३/१०/२०२५ आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम

३) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०२५/प्र.क्र.१०/का-६ दि.३०/०९/२०२५ चे मतदार यादी कार्यक्रम व सुधारीत दि.१३/१०/२०२५.

४) नगरविकास विभाग क्र.एमसीओ-२०२५/प्र.क्र.४०९/नवि-१४, दि.०६/१०/२०२५ रोजीचे नगराध्यक्ष आरक्षणाबाबतचे पत्र.

५) राज्य निवडणूक आयोगाचा सम क्रमांकाचे दि.०४/११/२०२५ निवडणूक कार्यक्रम.

६) राज्य निवडणूक आयोगाचे सम क्रमांकाचे दि.२६/११/२०२५ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींसाठी राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भ क्र.५ दिनांक ०४/११/२०२५ रोजी नुसार निवडणूक कार्यक्रम देण्यात आला होता. या कार्यक्रमानुसार नामनिर्देशनपत्रांची छाननी झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या निर्णयाविरोधात व्यथित उमेदवारास जिल्हा न्यायालयात अपील दाखल करण्याची निवडणूक नियमात तरतूद आहे व त्यानुसार व्यथित उमेदवाराकडून अपिल दाखल केले जाते.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा व नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ मधील नियम क्र. ४ मधील व नियम १७ (१)(ब) मधील तरतूदीनुसार राज्य निवडणूक आयोगाच्या दि.०४/११/२०२५ रोजीच्या जाहिर कार्यक्रमातील परिशिष्ट-१ मधील ६ (ब) नुसार काही जिल्ह्यात कार्यवाही न झाल्याने मा. उच्च न्यायालयात काही प्रकरणे याचिका दाखल झाल्या आहेत.

आणि ज्याअर्थी, नगरपरिषदा व नगरपंचायतीमध्ये अपील दाखल करण्यात आले होते त्या अपीलांवरील निकाल दि.२२/११/२०२५ रोजी पर्यंत होणे आवश्यक होते जेणेकरुन संबंधित उमेदवारास त्याचे नामनिर्देशनपत्र मागे घेण्यासाठी महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम-१९६६ मधील नियम १७ (१) (ब) नुसार तीन दिवसाचा कालावधी मिळाला असता व त्यानंतर दि.२६/११/२०२५ रोजी वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारास निवडणूक चिन्ह वाटप करणे नियमानुसार योग्य ठरले असते, परंतु काही नगरप्रिषदा, नगरपंचायतींच्या संदर्भात

(१) अपीलाचा निकाल उशिराने लागल्या नंतरही, अथवा

(२) लेखी निकाल प्राप्त न होता, अथवा

(३) काही प्रकरणी अपीलाची सुनावणी झाली नसतांना, अथवा

(४) काही प्रकरणी न्यायालयाच्या निकालाच्या अधीन राहून

संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अशा उमेदवारांना आपले नामनिर्देशनपत्र माघारी घेणेसाठी आवश्यक कालावधी न देताच निवडणूक चिन्ह वाटप केले असल्याचे निर्दशनास आले आहे.त्यामुळे अशा प्रकरणी संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दि.२६/११/२०२५ किंवा त्यांनतर केलेली चिन्ह वाटपची कार्यवाही नियमबाह्य ठरते.

आणि ज्याअर्थी, अशा प्रकरणी म्हणजेच जिल्हा न्यायालयातील दाखल प्रकरणात दि.२३/११/२०२५ रोजी किंवा तद्नंतर आदेश पारित झालेल्या प्रकरणात नियमांचे पालन झाले नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले असल्यामुळे

(अ) अशा नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या फक्त संबंधित सदस्यांच्या जागेकरीता आणि

(ब) अशा नगरपरिषदा व नगरपंचायतींचे अध्यक्ष पद असल्यास संपूर्ण नगरपरिषद / नगरपंचायतीच्या अध्यक्ष पदासाठी सद्या सुरु असलेली निवडणूक प्रक्रिया स्थगित

करुन नियमानुसार पूर्ण झालेल्या टप्प्यांपासून पुढील टप्प्यांसाठी संबंधित नगरपरिषद / नगरपंचायतीच्या निवडणुकीचा कार्यक्रम देणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा व नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ मधील नियम क्र. ४ (१) (क) मधील तरतूदीनुसार राज्य निवडणूक आयोग या स्थगित करण्यात आलेल्या अशा नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सदस्यांच्या जागेकरीता व यथास्थिती अध्यक्ष पदाकरीता या आदेशाद्वारे सुधारित निवडणूक कार्यक्रम देत आहे.

**-:आदेश:-**

१. जिल्हाधिकारी यांनी आपल्या जिल्ह्यातील नगरपरिषदा व नगरपंचायतीमध्ये ज्या जागेसाठी अपील दाखल होते परंतु अपीलाचा निकाल संबंधित जिल्हा न्यायालयाकडून दि.२२/११/२०२५ नंतर म्हणजेच दि.२३/११/२०२५ किंवा तद्नंतर देण्यात आलेला आहे **अशा नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सदस्य पदाच्या त्या जागेच्या निवडणूका दि.०४/११/२०२५ रोजीच्या कार्यक्रमानुसार घेण्यात येवू नयेत. तसेच अशा प्रकरणात अध्यक्ष पदाचा समावेश असल्यास त्या संपूर्ण नगरपरिषदेची निवडणूक स्थगित करण्यात आली आहे, याची कृपया नोंद घ्यावी.**

२. परिच्छेद क्र. १ नुसार केलेल्या कार्यवाही अंती ज्या नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सदस्यांच्या जागेच्या अथवा अध्यक्ष पदामुळे संपूर्ण नगरपरिषद / नगरपंचायतींच्या निवडणूका स्थगित करण्यात आल्या आहेत, अशा नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या जागांची व अध्यक्ष पदाबाबतची माहिती संबंधित जिल्हाधिकारी यांनी संकलित करावी व अशा नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सदस्य पदाच्या व यथास्थिती अध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी जिल्हाधिकारी यांनी सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-१** मध्ये दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार सुधारित सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम राबवावा.

३. जिल्हाधिकारी यांनी आपल्या जिल्ह्यातील ज्या नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या जागेच्या अथवा अध्यक्ष पदासाठी सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार निवडणूक जाहीर करण्यात येणार आहे त्याची तयार केलेली यादी (परिच्छेद-२ नुसार) सोबत जोडलेल्या परिशिष्ट-२ मधील प्रमाणपत्रासह राज्य निवडणूक आयोगास विनाविलंब सादर करावी.

४. परिशिष्ट-१ येथील निवडणूक कार्यक्रमानुसार मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० अशी असेल. सदर कार्यक्रमास आवश्यकतेप्रमाणे व नियमाप्रमाणे व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

५. निवडणुकीची आचारसंहिता निवडणूक कार्यक्रम निर्गमित केलेल्या वेळेपासून लागू होऊन निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील. सदरची आचारसंहिता सदस्य पदाची निवडणूक असल्यास त्या प्रभागापुरती व अध्यक्ष पदासाठी असल्यास संपूर्ण नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या क्षेत्रास लागू राहील. उपरोक्त क्षेत्रातील मतदारांवर प्रलोभन देणारी कोणतीही कृती/ घोषणा कोणत्याही मंत्री, खासदार, आमदार, नगरसेवक किंवा इतर पदाधिकाऱ्यांना इतरत्र सुध्दा करता येणार नाही.

६. नवीनतम उपक्रम राबविण्यासंदर्भात वेळोवेळी देण्यात येणाऱ्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

७. सदरचा निवडणूक कार्यक्रम आयोगाच्या या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. राज्य निवडणूक आयोगाकडील संपर्क क्रमांक पुढील प्रमाणे:-

| | |
|---|---|
| संकेत स्थळ | : https://mahasecelec.in/ |
| दूरध्वनी क्रमांक (नगरपालिका शाखा) | : २२८४६७२१ |
| दूरध्वनी क्रमांक (संगणकीकरण शाखा) | : २२८८६९५० |
| ई-मेल | : sec.council@mah.gov.in / sec.compu@mah.gov.in |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

**सहपत्र- परिशिष्ट-१ व २**

(सही) २०/११/२०२५

( सुरेश काकाणी )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :- १) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
३) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
४) मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५) प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
६) पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

७) संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.

८) विभागीय आयुक्त, सर्व

९) संबंधित जिल्हा पोलिस अधिक्षक

१०) संबंधित नगर परिषदा व नगरपंचायतींचे मुख्याधिकारी/प्रशासक

११) संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई- ४०० ००४.

१२) राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठांमध्ये नेमलेले वकील.

१३) माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.

१४) राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील सर्व कार्यासने

# परिशिष्ट – १ (सार्वत्रिक निवडणुकांसाठी)

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ-२०२५/सुनिका/नप/प्र.क्र.१४/का.६, दि.२९/११/२०२५ सोबतचे सहपत्र)

**न्यायालयीन अपील दाखल झालेल्या तसेच उपरोक्त दि.२९/११/२०२५ च्या पत्रातील परिच्छेद-३ मधील नमूद ४ बाबींमुळे बाधित झालेल्या नगरपरिषदा व नगरपंचायतींमधील सार्वत्रिक निवडणुकांसाठी सुधारित निवडणूक कार्यक्रम-२०२५.**

| अ.क्र | निवडणूकीचा टप्पा | तपशिल |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकाऱ्यांनी निवडणूक कार्यक्रम जारी करण्याची तारीख | **०४/१२/२०२५** |
| २ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक | **१०/१२/२०२५<br>दुपारी ०३.०० वाजेपर्यंत** |
| ३ | आवश्यकते प्रमाणे निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | **११/१२/२०२५** |
| ४ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | **२०/१२/२०२५<br>सकाळी ७.३० पासून ते सायंकाळी ५.३० पर्यंत** |
| ५ | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | **२१/१२/२०२५<br>सकाळी १०.०० वाजल्यापासून** |
| ६ | **शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे** | **दि.२३/१२/२०२५ पुर्वी<br>कलम १९ मधील तरतुदीनुसार** |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

२-१२-२०२५

( सुरेश काकाणी )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

# परिशिष्ट-२

## प्रमाणपत्र

मी, जिल्हाधिकारी याद्वारे असे प्रमाणित करतो/करते की, ............ जिल्ह्यातील

(अ)................ नगरपरिषदेच्या जागेकरीता

१. जागा क्र.....................

२. जागा क्र....................

३. जागा क्र.....................

(ब) ..............नगरपंचायतीच्या जागेकरीता

१. जागा क्र...................

२. जागा क्र....................

३. जागा क्र.....................

(क)..................नगरपरिषदेच्या / नगरपंचायतीच्या अध्यक्ष पदासाठी

सार्वत्रिक निवडणुकांमध्ये आणि निवडणुकीमध्ये महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम-१९६६ च्या नियम-१७ (१) (ब) नुसार कार्यवाही न झाल्याबाबत खात्री केली आहे. त्यानुसार निवडणूक स्थगित करुन राज्य निवडणूक आयोगाच्या क्र. रानिआ/सुनिका/नप/प्र.क्र.१४/का-६, दि.२९/११/२०२५ रोजीच्या सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार राबविण्यात येत आहे.

**स्वाक्षरी,**

**जिल्हाधिकारी..................**